## महाराष्ट्र शासन

## श्री.छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,सोलापूर

Opposite District Court, Civil Chowk, Solapur- ४१३ ००३, Maharashtra State, INDIA

Dean : ०२१७-२७४९९४१८, २७४९९४०१ Fax : ०२१७-२३१०७६६

website:- www.vmgmc.edu.in e-mail:- deansolapur@gmail.com

जा.क्र. श्रीछशिमसरुसो/शभां/ 7430 /२०२२ दि. 15/09/२०२२

### जाहीर ई- निविदा सुचना

अधिष्ठाता यांचे कार्यालय, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर करीता सन २०२२-२३ या वर्षामध्ये नायट्रस ऑक्साईड सिलेंडर निविदाधारकाच्या मालकीचे व रुग्णालयाच्या मालकीचे सिलेंडर रिफीलींग करण्यासाठी एक वर्षाच्या कालावधीसाठी खालील तपशीलाप्रमाणे जाहीर ई- निविदा मागविण्यात येत आहेत.

औषधी नायट्रस ऑक्साईड (मेडीकल गॅसेस)

| अ. क्र. | साहित्याचा तपशील | निविदा फॉर्म फी (ना परतावा) | निविदा बयाना रक्कम भरावयाची | तपशील व कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | Nitrous Oxygen cylinder ३७४४ capacity | ३२००/- | १६०००/- | निविदाधारकाच्या मालकीचे तसेच रुग्णालयाच्या मालकीचे सिलेंडर रिफिलिंग करण्यासाठी रुग्णालयातून घेऊन जाणे व रिफीलिंग करुन इच्छीतस्थळी आणून देणे यासाठी निविदा स्वीकारल्या पासून एक वर्षासाठी |
| २ | Nitrous Oxygen cylinder १८५१ capacity | | | |

नोट:- वरील कामाची ई निविदा दि. १८/०९/२०२२ ते दि. २२/०८/ २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्तळावर उपलब्ध असेल.

अधिष्ठाता

श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर

महाराष्ट्र शासन

# श्री.छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,सोलापूर

औषधी नायट्रस ऑक्साईड (मेडीकल गॅसेस)

रिफीलिंगसाठी वार्षिक ई निविदा

सन २०२२-२३ करीता

ई निविदा वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १ | ई निविदा सादर करण्याचा कालावधी | दि.16/9/२०२२ रोजी सकाळी ११.०० पासून दि.22/9/२०२२ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील. |
| २ | ई निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | अंतिम तारीख दि.22/ /२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत राहील. |
| ३ | निविदापुर्व बैठक | दि.19/9/२०२२ रोजी दुपारी ४.०० वा राहील |
| ४ | ई निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ | निविदा दि23/9/२०२२ रोजी दुपारी ३.३० वाजता अधिष्ठाता यांचे दालनामध्ये उघडण्यात येतील. प्रशासकीय किंवा तांत्रिक अडचणीमुळे निविदा उघडणे शक्य न झाल्यास संबधीत निविदाधारकांना निविदा उघडण्याची तारीख व वेळ कळविण्यात येईल. |

## ई-निविदा विषयी अटी व शर्ती

१. निविदा डाऊनलोड करण्यासाठी WWW.mahatenders.gov.in या संकेतस्तळावर उपलब्ध असेल. निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या मेन पोर्टल WWW.mahatenders.gov.in वर इनरोल करणे आवश्यक आहे.

२. प्रशासकीय किंवा तांत्रिक अडचणीमुळे निविदा उघडणे शक्य न झाल्यास संबधीत निविदाधारकांना निविदा उघडण्याची तारीख व वेळ कळविण्यात येईल.

३. औषधी नायट्रस ऑक्साईड (मेडीकल गॅसेस)रिफीलिंग करावयाची विस्तृत माहिती निविदेमध्ये दिलेली आहे.

४. निविदेसाठी आवश्यक कागदपत्राचा तांत्रिक लिफाफा दि23/09/२०२२ रोजी दुपारी ४.०० पर्यंत अधिष्ठाता यांचे कार्यालय, श्री. छ.शि.म.सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथील आवक विभागात जमा करावा.

५. इतर अटी व शर्ती ई निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामाची एक अथवा सर्व ई निविदा स्वीकारणे अथवा कारण न दाखवता रद्द करण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता, श्री. छ.शि.म.सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे.

६. निविदा फी व बयाणा रक्कम ही फक्त नेट बँकीग पध्दतीने भरण्यात यावी.

७. निविदाकारांना वर नमुद केलेल्या संकेत स्तळावर ऑनलाईन निविदा भरणे संदर्भात व डीजिटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी ९६६५७६७०३८,९८२२९२८२४१ क्रमांकावर संपर्क साधावा.

८. ज्या निविदाकाराची निविदा मंजूर होईल त्यांना निविदा मंजूर रकमेच्या ३ टक्के रकमेची बँक गॅरंटी राष्ट्रीयकृत बँकेच्या डी.डी. स्वरुपात दयावी लागेल.

अधिष्ठाता

श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर

# श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर

अधिष्ठाता यांचे कार्यालय,

नायट्रस ऑक्साइड गॅस सिलेंडर रिफीलिंगसाठी वार्षिक ई-निविदा सन २०२२-२३ करीता

ई निविदा विषयी अटी व शर्ती

१) निविदाकारांनी सर्व दस्तऐवज ऑनलाईन पध्दतीने सादर करणे अनिवार्य राहील. निविदा फी बयाणा रक्कम हि फक्त नेट बँकींग पध्दतीने भरण्यात यावी. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रिये मध्ये कोणत्याही टप्यावर निविदेतुन माघार घेतल्यास त्यांची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.

२) सदर कामाची निविदा कोणतेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखुन ठेवले आहेत. निविदा श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापुर कार्यालयामार्फत रदद केल्यास बयाणा रक्कम ऑनलाईन पध्दतीने परत केली जाईल.

३) निविदेतील सिलेंडरची संख्या अंदाजित असुन तिच्यामध्ये वाढ अथवा घट होण्याची शक्यता आहे. तसेच सध्या कोरोना महामारी असल्यामुळे ऑक्सीजन सिलेंडर मागणीनुसार जास्तीचे सिलेंडर उपलब्ध करणे व वेळेत उपलब्ध करणे बंधनकारक राहील

४) निविदा ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येईल.शासन निर्णय उद्योग उर्जा विभाग क्र.भाखस२०१४/प्रक्र.८२/भाग-III/उद्योग-४ दि.०१/१२/२०१६ मधील ई-निविदा पध्दतीने व महाराष्ट्र परचेस मॅन्युअल व अनुषंगिक तरतुदीचे काटकोर पालन करण्यात यावे.

अ-तांत्रिक निविदेचा लिफाफा क्र.१ (सदर कागदपत्रे अपलोड करणे व जोडणे बंधनकारक)

१) निविदा प्रपत्र डाऊनलोड केल्याची निविदा फी व बयाणा रक्कम ही फक्त नेट बॅकींग पध्दतीने भरले बाबतची पावती प्रिंट निविदा कागदपत्रासोबत अपलोड करण्यात यावी.

२) मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ च्या अंतर्गत नोंदणी अदयावत नुतनीकरण असल्याचा दाखला / प्रमाणपत्र जोडावे.

३) अन्न अणि औषध प्रशासन यांचे वैध प्रमाणपत्र जोडावे.

४) निविदा फॉर्म व बयाना रक्कम निविदाधारकानी ऑनलाईन व्दारे शुल्क अदा करावीत.

५) निविदाधारकाच्या पात्रता व आर्थिक उलाढाल सक्षमतेसाठी संस्थेचे मागील तीन वर्षाचे सी. ए. कडून तपासणी झालेला अहवाल जोडावा.

६) संस्थेचे पॅन क्रमांक प्रमाणपत्र व अनुभव प्रमाणपत्र जोडावे.

७)विक्रीकर नोदंणी प्रमाणपत्र तसेच आयकर,व्यवसाय कर/प्राप्तीकर भरणा केल्याचे मागील तीन वर्षाचे प्रमाणपत्र जोडावेत व कर भरणा केलेल्याची चलनप्रत सोबत जोडावी.

८) जीएसटी बाबतचे मागील तीन वर्षाचे प्रमाणपत्र जोडावे.

९) पॅन कार्ड व टॅन कार्ड यांची स्वयंसाक्षांकित झेरॉक्स प्रत

१०) निविदाधारकाची मागील तीन वर्षाची अर्थिक उलाढाल प्रत्येक वर्षाला १० लाखाच्या वर असणे गरजेचे आहे व तसे सी. ए. चे प्रमाणपत्र जोडावेत. तसेच अनुभव प्रमाणपत्र आवश्यक आहे.

११) ज्या निविदाधारकाची निविदा मंजूर होईल मंजुर निविदा रक्कमेची ३ % बँक गॅरंटी राष्ट्रीयकृत बँकेच्या डी. डी . च्या स्वरुपात दयावी लागेल.

१२) निविदा दर हे निविदा मंजूर झाल्यापासून एक वर्षापर्यंत वैध राहतील. त्यानंतर कोणतीही सुचना न देता निविदा करार आपोआप रद्द होतील. एकदा भरलेले दर कायम राहतील व त्यात कोणतीही वाढ कोणत्याही कारणास्तव देण्यात येणार नाही.

१३) सदरील निविदाबाबत कसलाही वाद उपस्थित झाल्यास याबाबत न्यायालयीन कार्यक्षेत्राकरीता सोलापूर हे मुख्यालय राहील.

१४) निविदाधारकाची कसलीही अट व शर्त मान्य करण्यात येणार नाही.

१५) निविदेतील दरात साम्य असल्यास त्याबाबतच अंतिम निर्णय मा.अधिष्ठाता यांचा राहील.

१६) पुरवठा आदेश दिल्यापासून आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे पुरवठा करणे निविदाधारकास बंधनकारक राहील.

१७) काही तांत्रिक कारणास्तव निविदा स्वीकारणे किंवा कोणत्याही वेळी रद्द करणे याचा अधिकार मा. अधिष्ठाता यांनी राखून ठेवला आहे.

१८) मंजुर झालेल्या दरानुसार पुरवठा करताना तपशीलात दिल्याप्रमाणे कार्यालयाने घालून दिलेल्या अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करुन पुरवठा करावा लागेल. विवरणात बदल घडून आल्यास पुरवठा स्वीकारला जाणार नाही. पुरवठादाराने स्वखर्चाने श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथून मान्य निविदाकाराच्या मालकीचे रिकामे सिलेंडर घेऊन जाणे व भरलेले सिलेंडर रुग्णालयामध्ये इच्छित स्थळी पोहोच करणे बंधनकारक राहील.

१९) निविदाकाराच्या दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे अधिष्ठाता श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांना बंधनकारक राहणार नाही.

२०) उपरोक्त सर्व कागदपत्र ही खरी असुन ती खोटी असल्याचे दिसुन आल्यास होणा-या कारवाईस मी स्वत:जबाबदार असले बाबत व निविदेतील सर्व अटी व शर्ती मी स्वत: वाचले असुन मान्य असले बाबतचे विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर ५००/- किंमतीचे स्टॅम्प पेपर वर केलेले प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

२१) कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कसले ही कारण न देता नाकारण्याचे किंवा रदद करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता , श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी राखुन ठेवला आहे.

अधिष्ठाता ,

श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर

# श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर

अधिष्ठाता यांचे कार्यालय,

नायट्रस ऑक्साइड गॅस सिलेंडर रिफीलिंगसाठी वार्षिक ई-निविदा सन २०२२-२३ करीता

**ई निविदा विषयी अटी व शर्ती**

ब) - अतांत्रिक /व्यापारी दरासंबधीची लिफाफा-

१) पुरवठा करावयाच्या सर्व औषधी वायु वरील सर्व प्रकारचे विक्रीकर प्राप्तीकर व इतर सामान्य कर या सर्व बाबी विचारात घेऊन सर्व करासह नायट्रस ऑक्साइडचे दर नमुद करावेत.

२) पुरवठा करावयाच्या सर्व औषधी वायु वाहन भाडे अथवा हमाली असे कोणतेही अतिरिक्त खर्च सदरील कार्यालयाकडुन देण्यात येणार नाहीत.

३) निविदेत नमुद केलेल्या दराबाबत कोणतीही अट नसावी. अपुर्ण व अटीसह असेलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

४) ज्या निविदाकाराची निविदा स्विकृत करण्यात आलेली आहे. त्यांनी तीन दिवसाच्या आत मा.अधिष्ठाता श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापुर यांचेशी निविदेतील दर व अटी शर्ती बाबत नोदंणीकृत करार करणे बंधनकारक राहील.

५) मंजुर निविदाधारकाने सुरक्षा ठेव मा.अधिष्ठाता कार्यालयाकडे धनाकर्षाने जमा करण्यात यावी.

६) सदरील सर्व औषधी वायु पुरवठा आदेश दिलेच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत मागणी करणा-या कार्यालयास करावा लागेल. अन्यथा पुरवठा आदेशात नमुद किमंतीच्या ०.५% दराने प्रति दिन दंड आकारण्यात येईल. दंडात्मक कारवाई बाबतचे सर्व अधिकार मा.अधिष्ठाता श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापुर यांना राहतील. केलेल्या कारवाईचा अंतिम निर्णय पुरवठा धारकास पाळणे बंधनकारक राहील.

७) जर पुरवठादाराने सदर काम अर्धवट सोडले तर त्याची बयाना रक्कम अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. सदरचे काम इतर पुरवठादाराकडुन करुन घेण्यात येईल. फरकाची रक्कम ठेकेदाराकडुन १८ % दराने व्याज व दंडासह एकरकमी वसुल केली जाईल.

८) मंजुर केलेल्या निविदापोटी भरणा केलेली बयाणा व अमानत रक्कम निविदा कालावधी पुर्ण झाले नंतर निविदे कामाबाबत कोणतीही तक्रार नाही याची खात्री करुन ऑनलॉईन पध्दतीने परत करण्यात येईल. नामंजुर निविदापोटी भरणा केलेली बयाणा रक्कम ऑनलाईन पध्दतीने परत करण्यात येईल.

९) निविदा धारकांच्या मंजुर बिलातुन नियमानुसार कर वजावट केली जाईल.

१०) नामंजुर निविदा बाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

११) या निविदा व कामकाजा संबधी काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ झाल्यास अथवा न्यायालयात जावे लागल्यास त्याचे न्यायक्षेत्र मर्यादा सोलापुर क्षेत्रापुरते मर्यादित राहील.

१२) निविदा धारकांनी सादर केलेले दर हे निविदा उघडलेल्या तारखेपासुन जास्तीत जास्त एक वर्ष बंधनकारक राहतील.

१३) निविदा स्विकृत करताना ज्या निविदाकाराने न्युनतम दर सर्व करासाहीत सादर केलेले आहेत. त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

१४) निविदेच्या शर्ती व अटीतील कोणतीही अट शिथिल करण्याचा अधिकार मा.अधिष्ठाता यांच्याकडे असेल.

१५) सदरील बाबीचे यादीत नमुद केलेल्या दर्जाच्याच व नमुद नामांकित कंपनीचा पुरवठा करणे निविदाकारांवर बंधनकारक राहील. दुय्यम दर्जाचे बाबीचे पुरवठा केल्यास त्यासदर्भात गठीत केलेल्या तज्ञ समितीच्या निर्णयानुसार व एफ.डी. ए. च्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१६)सदरील दर्जाबाबतचा समितीचा व एफ. डी. ए. यांचा निर्णय अंतिम राहील.

१७)यशस्वी निविदा धारकानी जमानत ठेव व करारपत्र याबाबी पुर्ण केल्यानंतरच खरेदी पुरवठा आदेश देण्यात येतील.

१८) तातडीचे प्रसंगी पुरवठा आदेश मिळताच काही तासात सांगेल त्याठिकाणी सदरील बाबी पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.

१९) निविदा स्विकृती पुर्वी आवश्कता असल्यास प्राप्त दराबाबत तडजोडीसाठी (Nigotiation) बैठक घेण्यात येईल तडजोडी अंती निश्चित झालेल्या दरांना मंजुरी देण्यात येईल.

अधिष्ठाता,

श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर